श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# Nit Document

## श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई.

### महाप्रसादाचे लाडू बनविण्यासाठी लागणाऱ्या गायीच्या शुध्द तूपाच्या खरेदीसाठी ई–निविदा मागविण्याबाबत.

### गायीचे शुध्द तूप पुरवठा कालावधी एप्रिल, २०२३ ते दिनांक ३१ मार्च, २०२४ पर्यंत

**ई–पुनर्निविदा सूचना :**

मंदिरात भाविकांना वितरण करण्यात येणारे महाप्रसादाचे लाडू बनविण्यासाठी लागणाऱ्या गायीच्या शुध्द तुपाच्या खरेदीसाठी ई–निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर किंवा www.siddhivinayak.org या न्यासाच्या अधिकृत वेबसाईटला भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| ई–निविदा प्रसिध्दीचा वार व दिनांक | – | बुधवार, १५ मार्च, २०२३ |
| निविदापुर्व बैठक वार व दिनांक | – | शुक्रवार, २४ मार्च, २०२३, दु. २.०० वा. |
| कच्चा माल नमुना तपासणीसाठी सादर करावयाचा अंतिम दिनांक | – | सोमवार, २७ मार्च, २०२३, दु. ५.०० वा. |
| ई निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | – | शनिवार, ०८ एप्रिल, २०२३, दु. १.०० वा. |
| तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | – | सोमवार, १० एप्रिल, २०२३, दु. १.०० वा. |
| मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ | – | सोमवार, १७ एप्रिल, २०२३, दु. १२.०० वा. |
| स्थळ | – | श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर, तिसरा मजला, न्यास कार्यालय. |

सही/–
(नंदा राऊत)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## महाप्रसाद बनविण्यासाठी लागणाऱ्या गायीच्या तुपाच्या खरेदीसाठी ई–निविदा मागविण्याबाबत.

गायीचे शुध्द तूप पुरवठा कालावधी कार्यादेशाच्या दिनांकापासून ते ३१ मार्च २०२४ पर्यंत.



| अ.क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १ | ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती, सुचना, वार, दिनांक, वेळ | १ |
| २ | ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती | ३ ते ४ |
| ३ | ई–निविदेच्या अटी व शर्ती | ५ ते ८ |
| ४ | **महत्वाचे (Important)** | ९ |
| ५ | निविदेची किंमत/शुल्क, बयाणा रक्कम, पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबत माहिती | १० |
| ६ | गायीच्या तुपाचे विनिर्देश (Specification) पान क्र.११ व १२ वर | ११ ते १२ |
| ७ | निविदाधारकाबाबतची माहिती | १३ |
| ८ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे व न्यासास सादर करावयाची कागदपत्र | १४ |
| ९ | हमीपत्र | १५ |
| १० | मागिल ३ वर्षांची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सी. ए. यांचे प्रमाणपत्र | १६ |
| ११ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाचे बीड ऑफ कोटेशनचा (BOQ) मुळ निविदेचा तपशील | १७ |

## ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती.

१) ई–निविदा अपलोड करतेवेळी निविदेची किंमत/शुल्क व बयाना रक्कम निविदा कागदपत्रांतील पान क्र. १० प्रमाणे ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फतच जमा करावी लागेल. बयाना रकमेवर व्याज अनुज्ञेय होणार नाही.

२) ऑनलाईन इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. बॅक किंवा इतर इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. MOPS (Multiple Option Payment System) चा वापर करावा.

३) ई–निविदा अपलोड करतेवेळी ऑनलाईन बॅकींगमार्फत न्यासास जमा केलेल्या निविदेची किंमत/शुल्क व बयाना रक्कमेबाबतची पावती प्रत अपलोड करावी.

४) ई–निविदेसोबत राष्ट्रीयकृत वा अनुसूचित बॅकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate) अपलोड करणे आवश्यक आहे. पतदारी दाखला न्यासास पुरवठा करावयाच्या एकूण मालाच्या वार्षिक मुल्याच्या अंदाजे ३०% रक्कमे इतका असावा. तसेच निविदाधारकाची आर्थिक उलाढाल ही पुरवठा करावयाच्या मालाच्या एकूण वार्षिक मुल्याच्या कमीत कमी दहापट असावी. त्याबाबत माहितीचा तपशील पान क्र. १० वर पहावे.

५) ई–निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे. अपूर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा संपूर्ण अधिकार न्यास व्यवस्थापन समितीने राखून ठेवलेला आहे त्याबद्दलची कारणे देणे न्यास व्यवस्थापन समितीवर बंधनकारक राहणार नाही.

६) महाप्रसादाकरीता लागणाऱ्या गायीच्या तुपाचा पुरवठा सातत्याने व वेळेतच होण्यासाठी गायीच्या तुपाचे निविदाधारक/उत्पादक यांचे प्लान्ट हे श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर, प्रभादेवी पासून ५०० कि.मी. परिक्षेत्रातील असावेत.

७) ई–निविदाधारकास गायीच्या तुपासाठी विहित केलेली पान क्र. १० मधील बयाना रक्कम ही अदा करावी लागेल. निविदेतील दर हे कर वगळून असावेत. न्यासास पुरवठा करावयाचे गायीचे तूप व प्रयोगशाळा तपासणीसाठी सादर करावयाचे गायीचे तूप FSSAI standards अथवा न्यासाने विनिर्देश (Specification) केल्याप्रमाणे सोबत दिलेल्या **पान क्र. ११ व १२** नुसारच असावा. प्रयोगशाळा तपासणी अहवालाच्या निकषावर निविदाधारक अंतिम करण्यात येईल. **अशी कार्यवाही करताना गायीच्या तुपाच्या गुणवत्तेचा, प्रयोगशाळा तपासणी अहवाल तसेच पान क्र. ९ वर नमूद गुणतालिकेचा प्राधान्याने विचार करण्यात येईल. केवळ न्युनतम दर प्राप्त झाला म्हणून निविदा स्विकारण्याचे बंधन न्यासास/समितीस असणार नाही.**

## ई–निविदा मागविण्याबाबतची माहिती.

८) निविदेमध्ये नमूद गायीच्या तुपाचे एकूण २ किलो वजनाचे नमुने तपासणीसाठी सोमवार, दिनांक, २७ मार्च, २०२३, सायं. ०५.०० वाजेपर्यंत जमा करून व तपासणीसाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम भरुन त्याची पोच घ्यावी. तपासणीसाठी गायीच्या तुपाचे नमुने न पुरविणाऱ्या निविदाधारकांच्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

९) **तपासणीसाठी सादर करावयाचे नमुने हे प्लान्टमधील चालू उत्पादनातील ताजे तूप बंद बाटलीतून पाठवावे. तसेच नमुने काचेच्या एक लिटरच्या बाटलीमध्ये भरुन त्यावर उत्पादनाचा दिनांक व बॅचकोड ईत्यादी माहिती सविस्तर पणे नमूद केलेली असावी. बाजारातील विक्रीचे पॅक नमुना म्हणून स्विकारले जाणार नाही.**

१०) ई–निविदेसोबत पान क्र. १४ वर नमुद केलेली कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहेत. कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर मूळ निविदा (वाणिज्यिक–Commercial) उघडण्यात येईल.

## अटी व शर्ती

१) गायीच्या तुपाच्या पुरवठयाचा कालावधी हा प्रथम पुरवठा आदेश दिनांकापासून ते ३१ मार्च २०२४ अखेर पर्यंत वैध राहील. तथापि कार्यादेशाचा कालावधी संपल्यानंतर पुढील वर्षाकरीता गायीच्या तुपाच्या पुरवठयासाठी निविदा प्रक्रियेद्वारा नविन निविदाकाराची नेमणूक होईपर्यंत वा त्याने गायीच्या तुपाचा पुरवठा सुरु करेपर्यंत पुरवठादारांस वरील कालावधीसाठी विहित केलेल्या दरातच गायीच्या तुपाचा पुरवठा करणे बंधनकारक राहिल व त्याकरीता कोणत्याही प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. तसेच कालावधीबाबतचा न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

२) ई–निविदा मंजूर झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत निविदाकाराने पुरवठा कालावधीमध्ये पुरवठा करावयाच्या एकूण गायीच्या तुपाच्या किंमतीच्या ५% रक्कमेची बॅक गॅरेंटी न्यासास सादर करणे बंधनकारक आहे. न्यासाकडे जमा असलेली बयाना रक्कम वजा करुन उर्वरीत रकमेकरीता बॅक गॅरेंटी स्विकारण्यात येईल. बॅक गॅरेंटी राष्ट्रीयकृत वा अनुसूचित बॅकेची असणे आवश्यक आहे.

३) निविदाकाराकडे स्वत:चा गायींचा फार्म असणे आवश्यक आहे. तसेच निविदाकार यांची स्वत:ची गायीचे दूध संकलन करण्याचे केंद्र/व्यवस्था असावी. आणि या संकलित केलेल्या गायीच्या दुधावर स्वत:च्या प्लांटमध्ये अत्याधुनिक प्रक्रीया करून त्यापासून गायीचे तूप करण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. तसेच सदर प्लांट एफ एस एस ए आय (FSSAI) मान्यताप्राप्त (Approved) व हायजिनिक दृष्टया स्वच्छ असावा. (The bidder for supply of cow ghee should have his own cow milk procurement system and facility for conversion of the same milk into cow ghee should exists in own plant. The plant should be FSSAI approved.)

४) गायीचे तूप बनविण्यासाठी लागणारे क्रीम/बटर तयार करण्याचे युनिट निविदाकाराचे स्वत:चे असावे. तूप तयार करण्यासाठी क्रीम किंवा बटर बाहेरून विकत घेतलेले नसावे. तसेच दुधापासून तूप बनविण्याची यंत्रणा स्वत:ची असावी. सदर यंत्रणेमार्फत बनविण्यात येणाऱ्या गाईच्या तुपाच्या उत्पादनाची क्षमता ही न्यासाला वार्षिक तूप पुरवठा करावयाच्या दहापट क्षमतेची असावी. तसेच दररोज एकूण दूध संकलन आणि दुग्धजन्य पदार्थांची तपासणी FSSAI किंवा EIC (Export Inspection Council) यांनी केलेली असावी. डेअरी प्लांटची प्रत्यक्ष पाहणी करताना याबाबतचा परिक्षण अहवाल तपासण्यात येईल.

५) निविदाकार हा व्यापारी (Trader) अथवा सी एन एफ एजन्ट नसावा, अथवा आल्याचे आढळल्यास निविदाकाराची निविदा रद्द/विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

६) ई–निविदेत तांत्रिकदृष्टया पात्र ठरलेले निविदाकार हे निविदेतील अट क्र. ३ व ४ मध्ये नमूद तसेच पान क्र. ९ मधील सर्व बाबींची पूर्तता करीत आहे किंवा कसे याची खात्री करण्यासाठी न्यास व्यवस्थापन समिती सदस्य, अधिकारी व न्यासाचे सल्लागार प्रत्यक्ष डेअरी प्लांटची पाहणी करून अहवाल सादर करतील.

७) तांत्रिक निविदा उघडल्यानंतर जे निविदाकार तांत्रिकदृष्टया आवश्यक कागदपत्रे सादर करतील त्यांची प्रत्यक्ष डेअरी तपासणी करण्यात येईल. तद्नंतर डेअरी तपासणीच्या गुणांकनानुसार वाणिज्जिक निविदा उघडण्यात येईल. त्यानंतर एल–१ निविदाकार अंतिम करण्यात येईल.

## अटी व शर्ती

८) गायीच्या तुपाचा पुरवठा फक्त १५ किलोच्या (१६.४८० लिटर चा एक डबा याप्रमाणे) Food Grade Tin Lacqered पत्र्याच्या सिलबंद डब्यातून पुरविणे बंधनकारक राहिल. (पान क्र. १२ नुसार), शिवाय न्यास व्यवस्थापन समिती निर्णय घेऊन एकत्रित पुरवठा (Bulk) करणेबाबत निर्देशित करू शकते.

९) गायीच्या तुपाचे गुणधर्म, विनिर्देश व इतर मापदंड (Parameters) हे **"NABL ACCREDITED LAB - APPROVED BY OR NOTED BY FSSAI"** प्रयोगशाळेतून तपासणी केलेले असावे. तसेच पुरवठा करण्यात येणाऱ्या गायीच्या तुपाचे पान क्र ११ व १२ नुसार लॅबमधून तपासणी केलेल्याचा अहवाल अपलोड करावा लागेल.

१०) ई–निविदेसोबत तपासणीकरीता गायीच्या तुपाचे जे नमुने दिले असतील त्या नमुन्यांची प्रयोगशाळा तपासणी केल्यानंतर जे मापदंड (Parameters) येतील तेच मापदंड (Parameters) गायीच्या तुपाचा पुरवठा करताना प्रत्येक डिलिव्हरी (Consignment) मध्ये असले पाहिजेत. जर त्यात तफावत असेल तर ते सर्व गायीचे तूप स्वखर्चाने परत घेऊन जाणे हे निविदाकारावर बंधनकारक राहील. अशा प्रकरणी **अट क्र. "१७ अ", "१७ क" व "१७ ड"** नुसार कारवाई करण्यात येईल.

११) न्यासाच्या खरेदी विभागाच्या आदेशाप्रमाणे वेळोवेळी गायीचे तूप पुरवावे लागेल. आवश्यकतेनुसार दरमहा अथवा कमी जास्त मुदतीत गायीच्या तुपाची मागणी केली जाईल. एकदम सर्व गायीचे तूप घेतले जाणार नाही. मागणीनुसार आलेले गायीचे तूप स्विकारले जाईल तसेच मागणीपेक्षा जास्त आलेले गायीचे तूप स्विकारले जाणार नाही. गायीच्या तुपाचा पुरवठा करावयाचे परिमाण अंदाजे असल्याने, न्यासाकडून प्रत्यक्षात कमी–जास्त मागणी होवू शकेल, त्याबाबत कोणतीही तक्रार चालणार नाही.

१२) निविदाकाराने गायीच्या तुपाची पोहोच स्वखर्चाने श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथे न्यासाचे खरेदी विभागाच्या गोडाऊनमध्ये पॅकींग व फॉरवर्डीगसह दिली पाहिजे. श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाकडून वाहतुकीचा व वाराईचा खर्च वेगळा दिला जाणार नाही. गायीचे तूप खरेदी विभागाच्या गोडाऊन शिवाय इतरत्र उतरवू नये. असे केल्यास गायीचे तूप गोडाऊनमध्ये पोहचविण्याचे लेबर चार्जेस बिलातून कपात करण्यात येईल.

१३) निविदेमध्ये नमूद केलेल्या वार्षिक परिमाणापेक्षा जादा गायीच्या तुपाची मागणी न्यासाकडून झाल्यास गायीच्या तुपाचा पुरवठा मान्य दरानेच करण्याचे बंधनकारक राहील.

१४) न्यासाला पुरविण्याचे गायीचे तूप न्यासाने विनिर्देश (Specification) केल्यानुसार नमुनाबरहुकूम शुध्द, उत्तम प्रकारचे पुरवावे लागेल. दुय्यम वा कमी दर्जाचे गायीचे तूप किंवा खराब गायीचे तूप स्विकारले जाणार नाही. अशा गायीच्या तुपाचा पुरवठा केल्यास तो स्वखर्चाने परत घेऊन जाणे हे निविदाकारावर बंधनकारक राहील. अन्यथा गायीच्या तुपाची नासधूस झाल्यास त्यासाठी न्यास जबाबदार राहणार नाही. खराब गायीच्या तुपाची देअके अदा केली जाणार नाहीत.

१५) निविदा प्रक्रियेमध्ये स्विकृत केलेले दर वर्षभरासाठी अथवा पुढिल पुरवठादाराची नेमणूक होईपर्यंत कायम राहतील. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव ठेका कालावधीत भाववाढ दिली जाणार नाही/मागता येणार

## अटी व शर्ती

नाही. आपण गायीचे तूप पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा गायीच्या तुपाचा पुरवठा न केल्यास आपली पुर्णत: किंवा अंशत: बयाना/बँक गॅरेंटीमधील रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. याप्रकरणी न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

१६) निविदाकाराने पुरवठा आदेश निर्गमित झाल्यापासून कमाल ५ दिवसात गायीच्या तुपाचा पुरवठा करणे आवश्यक असेल. विहित मुदतीत गायीच्या तुपाचा पुरवठा न केल्यामुळे न्यासाची अडचण/नुकसान होऊ नये म्हणून न्यासाला बाजार भावाने आवश्यकतेनुसार किंवा पुरवठा आदेशात नमूद परिमाणाचे गायीचे तूप खरेदी करण्याचे अधिकार/मुभा असेल. बाजारभावाने खरेदी केल्यामुळे जादा अदा केलेल्या रकमेची भरपाई पुरवठादारास करावी लागेल. सदर भरपाई देअकाच्या रकमेतून वा बयाना रकमेतून करण्यात येईल.

१७) न्यासास पुरवठा केलेल्या गायीच्या तुपाची प्रयोगशाळा तपासणी करण्यात येईल. सदर तपासणी शासकीय/निमशासकीय/बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाकडील प्रयोगशाळेतून अथवा अन्न व औषध प्रशासनाने प्राधिकृत केलेल्या प्रयोगशाळेतून करणेत येईल. त्याकरीता होणारा खर्च आपण सादर केलेल्या देअकातून वजा करुन देअक अदा करण्यात येईल. त्याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही. FSSAI standards किंवा निविदेतील Specification (पान क्र. ११ व १२) नुसार गायीच्या तुपाची पूर्तता करावी लागेल. पुरविण्यात आलेले गायीचे तूप FSSAI standards किंवा निविदेतील Specification (पान क्र. ११ व १२) नुसार नसल्यास अश्या पुरवठा केलेल्या गायीच्या तुपासंदर्भात पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**अ)** पुरवठादाराचा करार तात्काळ रद्द करून नव्याने ई–निविदा प्रक्रिया करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापन समितीस राहील. या विरोधात कुठल्याही लवादा समोर दाद मागता येणार नाही.

**(ब)** अपात्र/सदोष वापरलेल्या गायीच्या तुपाचे देअक अदा करताना त्यामधून २०% कपात दंड म्हणून करण्यात येईल.

**(क)** न्यासास पुरवठा केलेले अपात्र/सदोष गायीचे तूप एका आठवडयामध्ये स्वखर्चाने व जबाबदारीने परत नेणे पुरवठादारावर बंधनकारक असेल, अशा परत न नेलेल्या गायीच्या तुपाचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी न्यासावर असणार नाही व अशा पुरवठा केलेल्या गायीच्या तुपाच्या अनुषंगाने कोणतीही प्रदान/अदायगी केली जाणार नाही.

**(ड)** अपात्र/सदोष ठरलेले गायीचे तूप परत घेवून त्याऐवजी गुणवत्तेचा व दर्जेदार गायीचे तूप कमाल चार दिवसांत पुरविणे पुरवठाधारकास बंधनकारक राहील. विहित कालावधीत अश्या गायीच्या तुपाचा पुरवठा न केल्यास अन्य पुरवठादाराकडून अथवा बाजारभावाने गायीचे तूप मागविण्याची मुभा न्यासास राहील. याबाबत आपली कोणतीही तक्रार चालणार नाही.

**(इ)** कोणत्याही प्रकारे उद्‌भवलेल्या प्रसंगामुळे/परिस्थितीमुळे पुरवठादाराने तुप पुरवठा करावयाचे नाकारल्यास मंदिरातील महाप्रसाद तयार करण्याची प्रक्रिया निरंतर सुरू राहण्यासाठी पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत

## अटी व शर्ती

खुल्या बाजार भावाने शुध्द गायीच्या तुपाची खरेदी करण्यात येईल व सदर पुरवठादाराची EMD जप्त करून काळया यादीत अंतर्भूत करण्यात येईल.

१८) बिलामध्ये मूळ दर व अतिरीक्त कर असा ऊल्लेख करावा. सरकारी नियमानुसार आवश्यक तेथे आयकर कपात केली जाईल. देअक सादर करतांना देअकात, खरेदी आदेशातील वर्णनाप्रमाणेच गायीच्या तुपाचा ऊल्लेख करावा.

१९) पुरवठा करणेत आलेल्या गायीच्या तुपाची तपासणी करून, त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात येईल. गायीच्या तुपाच्या पुरवठयाबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२०) गायीच्या तुपाचा पुरवठा आदेश व देअकाची रक्कम न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाचे न्याय संवाद कक्षेत राहील.

२१) निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांत समक्ष येवून स्टॅम्पपेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास निविदाकाराने सादर केलेली निविदा न्यासाच्या अटी व शर्तीनुसार करारनामा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही. निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग असतील.

२२) बयाणा रक्कम/बॅक गॅरेंटी गायीच्या तुपाचा पुरवठा करार संपल्यावर ९० दिवसानंतर परत केली जाईल. बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२३) कोणतीही कारणे न देता ई–निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

२४) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाकाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

२५) गायीचे तूप पाठविताना रविवार व मंगळवार खेरीज सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजता पाठविण्याची दक्षता घेणे आवश्यक असेल. रविवार व मंगळवार या दिवशी गायीचे तूप उतरवून घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. न्यासाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत गायीचे तूप उतरविण्यात यावे. परस्पर गायीचे तूप उतरवून दिल्यास सदर तुपाच्या हिशोबाची व प्रदानाची जबाबदारी न्यासावर राहणार नाही.

२६) ज्या दिवशी ई–निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वारे अपलोड कलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

२७) संकेतस्थळाच्या माहितीकरीता **टोल फ्री क्र. १८००–३०७०–२२३२, टोल फ्री मो. क्र. ७८७८० ०७९७२,** ७८७८० ०७९७२

(नंदा राऊत)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

## महत्वाचे (Important)

महाप्रसाद बनविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या गायीच्या तूपाची गुणवत्ता उत्तम, दर्जेदार व १००% शुध्दता, असावी म्हणून निविदा प्रक्रियेकरीता न्यासातर्फे डेअरी तज्ञ सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर प्रक्रीयेमध्ये सहभाग घेणाऱ्या निविदाकारांच्या प्रथम तांत्रिक निविदा उघडून कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. कागदपत्रांच्या पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या सर्व निविदाकारांच्या तुपाच्या प्लांटची पाहणी करण्यात येईल. तुपाच्या प्लांटची पाहणी हा तांत्रिक निविदेचा भाग असेल. कागदपत्रांची पुर्तता करीत असलेल्या निविदाकारांच्या डेअरीला प्लांटला न्यासाने नियुक्त केलेली समिती डेअरी प्लांटला भेट देतील. सदर भेटी दरम्यान निविदाकारांच्या डेअरीमध्ये तयार करण्यात येणारे तूप हे केंद्र सरकार (FSSAI) व महाराष्ट्र शासन (FDA) यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बनविण्यात येत आहे किंवा कसे? तसेच डेअरीची स्वच्छता याची पाहणी करतील. डेअरीची पाहणी करताना न्यासाचे डेअरी तज्ञ सल्लागार यांनी तयार केलेल्या तपासणी सुचीनुसार (Check List) गुणांकन करण्यात येईल. सदर गुणतालिका १०० मार्कांची असून, १०० पैकी ८० पेक्षा कमी गुण मिळणाऱ्या निविदाकारांची निविदा तांत्रिकदृष्टया अपात्र ठरविण्यात येईल. तसेच मूल्य निविदा उघडताना ८० पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या निविदाकारांमध्येच स्पर्धात्मक पध्दतीने एल–१ निविदाकाराची निवड करण्यात येईल. याबाबत निविदाकारांची कोणतीही सूचना, मत किंवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**गुणांकन विभागणी खालिलप्रमाणे –**

1. LOCATION AND LAYOUT OF FOOD ESTABLISHMENT **(10 marks)**
2. EQUIPMENT AND FIXTURES **(10 marks)**
3. PERSONAL HYGIENE **(20 marks)**
4. FOOD OPERATIONS & CONTROL **(20 marks)**
5. FOOD TESTING FACILITY **(10 marks)**
6. CLEANING AND MAINTENANCE **(20 marks)**
7. PEST CONTROL SYSTEM **(10 marks)**

**टीप –**

**१) डेअरी प्लांटची पाहणी व त्यांचे गुणांकन हा तांत्रिक निविदेचा अविभाज्य भाग आहे. याबाबतचे सर्व अधिकार न्यास व्यवस्थापन समितीचे राहतील.**

## निविदा शुल्क व बयाणा रक्कम

| अ. क्र. | कच्चा माल | नमूद कालावधीत लागणारा अंदाजे माल | चालू वर्षाच्या दराने वार्षिक मुल्य (रु.) कर वगळून | निविदेची किंमत/शुल्क (रु.) | बयाणा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | गाईचे शुध्द तूप (Agmark) | २,००,००० लिटर | ८,७०,००,०००/- | २५,०००/- | ८,७०,०००/- |

टिप : वर नमूद मालाचे प्रमाण हे अंदाजीत आहे. त्यामध्ये घट किंवा वाढ होऊ शकते.

## पतदारी दाखला (Solvency certificate) व आर्थिक उलाढालीबाबत माहिती

| अ. क्र. | कच्चा माल | नमूद कालावधीत लागणारा अंदाजे माल | चालू वर्षाच्या दराने वार्षिक मुल्य (रु.) कर वगळून | पतदारी दाखला (Solvency certificate) रक्कम (रु.) रकाणा 'ड' च्या ३०% | अपेक्षित कमीत कमी आर्थिक उलाढाल रक्कम (रु.) रकाणा 'ड' च्या दहा पट |
|---|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (ड) | (इ) | (फ) |
| १ | गाईचे शुध्द तूप (Agmark) | २,००,००० लिटर | ८,७०,००,०००/- | २,६१,००,०००/- | ८७,००,००,०००/- |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई-४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 (Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# गाईचे शुध्द तूप (Pure Cow Ghee)

## गायीच्या शुध्द तुपाचे विनिर्देश (Specification) /दरमहा लागणारा माल (अंदाजे) – १६,७०० लिटर

## Grade Specification (Quality) of Ghee

### A) General Characteristics:

1. Shall be pure, clarified milk fat only.
2. Shall have a natural, sweet, pleasant odour, and agreeable taste and free from rancid or objectionable flavour.
3. The solid phase shall be of well defined granular strutures
4. Colour shall be yellowish (without added colour)
5. Shall be free from excess moisture, sediment, sediment foreign colouring matter.
6. Shall be clear, transparent on melting.

| Sr.No. | Parameters | Specifications |
|---|---|---|
| 1 | Description | Product derived from pasteurized cream/ butter made from pure cow's milk. It is free from animal body fat, vegetable oil & fat, mineral oils, wax and extraneous matter. |
| 2 | Flavor | Clean & Pleasant, free from objectionable odour & rancidity. |
| 3 | Texture | Smooth & Granular |
| 4 | Color | Uniform Golden yellow color |
| 5 | Milk Fat, % by mass, max. | 99.7 |
| 6 | Moisture content % by mass, max. | 0.3 |
| 7 | Free Fatty Acid (as Oleic), % max. | 0.50 |
| 8 | Butyro Refractometer (BR) reading | 40-43 |
| 9 | Reichert Meissel Value, min. | 25 |
| 10 | Mineral Oil Test | Negative |
| 11 | Peroxide Value, mEqO2/kg max. | 0.5 |
| 12 | Bauduoin Test | Negative |
| 13 | Extraneous Matter / Sendiments | Absent |

| Sr.No. | Parameters | Specifications |
|---|---|---|
| **14** | **Microbiological Parameters** | |
| 14.1 | Total Plate Count (TPC), cfu/g | <10 |
| 14.2 | Colifrom Count, cfu/g | <10 |
| 14.3 | E. coli, per g | Absent |
| 14.4 | Yeast & Mould, cfu/g | <10 |
| 14.5 | Salmonella, / 25 g | Absent |
| 14.6 | Staphylococus aureus (Coagulase positive) / g | <10 |
| 14.7 | Listeria monocytogenes, per g | Absent |
| 15 | Aflatoxin M1, ug/Kg | Max. 0.5 |
| 16 | Antibiotics Total B-Lactum | Absent |
| 17 | **HEAVY METALS** | |
| 17.1 | Lead | Max. 0.02 ppm |
| 17.2 | Arsenic | Max. 5 ppb |
| 17.3 | Cadmium | Max. 0.10 ppm |
| 17.4 | Mercury | Max. 0.10 ppm |
| 17.5 | Tin | Max. 250ppm |

**Package Specification**

**Material**: 1. Tin plate, food grade lacquered from inside with Single Welded joint. Newman (lacquered both side)

**Other Requirements**: 2. the tins and lids should withstand acidic copper Sulphete test for food lacquering. Tins should be received without any dents etc and free from dust, dirt etc. Alignment between mouth of tins and caps should be proper

## निविदाधारकाबाबत माहिती

१) फर्मचे/कंपनीचे नांव :----------------------------------------

२) पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

३) संपर्कासाठी दूरध्वनी/मोबाईल व ई–मेल क्रमांक

अ) चेअरमन :----------------------------------------

ब) डायरेक्टर :----------------------------------------

क) व्यवस्थापक :----------------------------------------

ड) ई – मेल :----------------------------------------

४) मालकांचे / भागीदारांची नावे अ) ----------------------------------------

ब) ----------------------------------------

५) जी एस टी क्रमांक :----------------------------------------

६) आयकर नोंदणी पॅन क्रमांक :----------------------------------------

## निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

**अ) लिफाफा नं. १ मधील कागदपत्रे (तांत्रिक–Technical)**

०१. निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची इटरनेट बॅकेकडील पावतीची प्रत

०२. बयाना रक्कम जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅकेकडील पावतीची प्रत

०३. राष्ट्रीयकृत/अनुसूचित बॅकेचा पतदारी दाखला (Solvency Certificate)

०४. अद्ययावत कंपनी नोंदणी दाखला/दुकाने नोंदणी दाखला/तत्सम शासकीय परवाना

०५. अद्ययावत एफ. एस. एस. ए. आय. प्रमाणपत्र (Fssai Registration Certificate) (आवश्यकतेनुसार)

०६. ॲगमार्क परवाना (गाईच्या शुध्द तुपाकरीता)

०७. आयकर नोंदणी पॅन कार्ड

०८. जी एस टी नोंदणी दाखला अगर जी एस टी ऑनलाईन रजिस्ट्रेशन पावती

०९. मागील ४ वर्षाचा (आर्थिक वर्ष २०१८–२०१९, २०१९–२०, २०२०–२१, २०२१–२२) आय. टी. आर. व जी. एस. टी. रिटर्नस

१०. वर्ष २०१८–२०१९, २०१९–२०, २०२०–२१, २०२१–२२ या ४ वर्षापैकी कमाल (जास्तीत जास्त) आर्थिक उलाढाल असलेल्या ३ वर्षांची सरासरी आर्थिक उलाढाल नमुद असणारे सी. ए. यांचे प्रमाणपत्र (पान क्र. १६ वरील नमुन्यानुसार)

११. सन २०२१–२०२२ चा वार्षिक उलाढालीबाबत लेखा परिक्षण अहवाल (Audited Balance sheet)

१२. भागीदार कागदपत्रांची साक्षांकित झेरॉक्स प्रत (आवश्यकतेनुसार)

१३. हमी पत्र

१४. निविदा उघडण्याच्यावेळी कंपनी/संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत

**(वरीलप्रमाणे सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती न्यासास सादर कराव्या.)**

**ब) लिफाफा नं. २**

०१ मूळ निविदा (वाणिज्यिक–Commercial) BOQ

## (फर्म/कंपनीच्या लेटरहेडवर)

### हमीपत्र

प्रति,

कार्यकारी अधिकारी,

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास,

प्रभादेवी, मुंबई – ४०००२८

महोदया,

मी/आम्ही ——————————————————————————————

खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी/आम्ही कागदपत्रे, अटी व शर्ती, अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही.

२. निविदा अटी – शर्ती नुसार महाप्रसाद विभागासाठी लागणारा कच्चा माल आम्ही निविदा व वाटाघाटीनंतर कायम केलेल्या दराने कोणताही वाद न करता वर्षभर पुरवठा करू.

३. मी/आम्ही नमूद केलेल्या दरामध्ये जीएसटी वगळून सर्व प्रकारच्या शुल्कांची आकारणी समाविष्ट आहे.

४. आमची निविदा स्विकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालावधीत न्यासाने विहीत केल्यानुसार Bank Guarantee देण्यास बांधील आहोत.

५. आम्ही याद्वारे हमी देतो की, शासकीय / निमशासकीय / सार्वजनिक उपक्रम यांनी यापूर्वी आमच्या मालाचा पुरवठा करण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई आमच्या विरूध्द केलेली नाही.

६. आम्हास माहित आहे की, निविदा स्विकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

७. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती, अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहेत.

दिनांक :    /    /२०२३

निविदाधारकाची सही व शिक्का

## (सी. ए. यांचे लेटरहेडवर)

## वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ---------------------------------------यांच्या व्यवसायाची वर्ष २०१८–२०१९, २०१९–२०, २०२०–२१, २०२१–२२ या चार वर्षांपैकी कमाल (जास्तीत जास्त) आर्थिक उलाढाल असलेल्या तीन वर्षांची सरासरी आर्थिक उलाढाल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०१८–२०१९ | |
| २ | वर्ष २०१९–२०२० | |
| ३ | वर्ष २०२०–२०२१ | |
| ४ | वर्ष २०२१–२०२२ | |
| | एकूण उलाढाल (कोरोना काळ वगळून) | |
| | सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :– / / २०२३

ठिकाण :–

लेखापरीक्षकाची सही/चार्टर्ड अकाऊटंन्ट
(नाव/सही शिक्का)

नोंदणी क्रमांक:–